राज्य योजनांतर्गत योजना बिनतारी संदेश यंत्रणेची बळकटीकरण व परिरक्षण योजनेअंतर्गत सन २०१८-१९ अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. टिआरएस-०५/२०१८/प्र.क्र.१५३/फ-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० मे, २०१८

वाचा :- १. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दिनांक २.४.२०१८
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.(१८-१९)/२५९, दि.१८.५.२०१७

प्रस्तावना :-

राज्य योजना-बिनतारी संदेश यंत्रणेची उभारणी, बळकटीकरण व परिरक्षण करणे या योजनेचा रु.१००.०० लक्ष एवढया रकमेचा सन २०१८-१९ चा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी सादर केला आहे.

त्याअनुषंगाने सन २०१८-१९ या वर्षामध्ये नागपूर, अमरावती, चंद्रपूर, ठाणे, धुळे वनवृत्तातील बिनतारी संदेश यंत्रणेचे सबलीकरण व देखभाल ही राज्य योजनाअंतर्गत फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (राज्य) (२४०६ २१६१) करण्याकरीता रु.१००.०० लक्षचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.२ वरील दिनांक १८.५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला असून सदरची रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वित्त विभागाच्या दिनांक २.४.२०१८ च्या परिपत्रकान्वये एकूण अर्थसंकल्पित निधीच्या ७०% रक्कम वितरीत करण्यास योजनेच्या व्याप्ती व स्वरुपात बदल होत नसल्याने मंजूरी दिली आहे. त्या अनुषंगाने या योजनेच्या एकूण अर्थसंकल्पित निधीच्या म्हणजेच रु.१२२.६५ लक्षच्या ७०% म्हणजे रु.८५.८६ लक्ष इतकी रक्कम मंजूर करुन अर्थसंकल्पित वितरण प्रणालीद्वारे (BDS) वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

सदर योजनेवर होणारा खर्च मागणी क्र.सी-०७, प्रधानशीर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०१ वनीकरण १०१ (११) वनसंधारण व विकास, (११) (२९) ५२ फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (राज्य), ५० इतर खर्च, (२४०६ २१६१) नागपूर, अमरावती, चंद्रपूर, ठाणे, धुळे वनवृत्तातील बिनतारी संदेश यंत्रणेचे सबलीकरण व देखभाल ही राज्य योजना अंतर्गत योजना (२४०६ २१६१), ५०, इतर खर्च या

लेखाशीर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३ दिनांक २.४.२०१८ च्या परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११३१९४३५३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.06.01 13:19:56 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक).
५) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९) जिल्हा कोषागार अधिकारी- अमरावती, गडचिरोली, नागपूर, चंद्रपूर, औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर, नाशिक, ठाणे, यवतमाळ.
१०) कार्यासन अधिकारी, ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
यांना विनंती करण्यात येते की, नमूद शासन निर्णयानुसार रक्कम वितरित करण्यात यावी.
११) कार्यासन अधिकारी फ-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) फ-६, कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.